**गोपनीय / फक्त कार्यालयीन उपयोगासाठी**

महाराष्ट्र शासन

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.

---

क्र. अपोमसं/प्रशिक्षण/पो.शि.भरती २०२२-२०२३/१७३/२०२३ मुंबई दिनांक :- ०६/०६/२०२४.

विषय :- सन २०२२-२०२३ ची पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया कार्यपध्दती.

* * * * * *

**परिपत्रक :-**

सन २०२२ व सन २०२३ मधील पोलीस शिपाई संवर्गात रिक्त असलेली पदे भरती प्रक्रियेने भरण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करुन **दिनांक ०५.०३.२०२४ ते १५.०४.२०२४** या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने ॲप्लीकेशन मागविण्यासाठी policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली होती.

२. पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेसाठी तयार करण्यात आलेल्या जाहिरातीच्या मसुद्यामध्ये पोलीस शिपाई पदाच्या भरतीशी संबंधीत सेवाप्रवेश नियम, शासन निर्णय, परिपत्रके इ.बाबत policerecruitment2024.mahait.org **आणि** www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर सविस्तरपणे उहापोह करण्यात आलेला आहे. तरीही प्रत्यक्ष भरती प्रक्रिया सुरु होईपर्यंत किंवा भरती प्रक्रिया सुरु असतांना सेवाप्रवेश नियम, शासन निर्णय, परिपत्रके इत्यादींमध्ये झालेल्या बदलांप्रमाणे भरती प्रक्रिया राबविण्याची खबरदारी घटक प्रमुखांनी घ्यावी.

३. पोलीस शिपाई / कारागृह शिपाई / बॅण्डस्मन भरती प्रक्रिया ही सुरळीत, सुलभ व पूर्ण पारदर्शकता ठेवून करण्यासाठी शासनाने शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक आरसीटी-०३११/प्र.क्र.२२८/पोल-५अ, दिनांक १६/०६/२०११ अन्वये "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११" निर्गमित केले आहेत. तसेच, सदरहू सेवाप्रवेश नियमांमध्ये शासनाने वेळोवेळी सुधारणा केलेली आहे. सदरचे नियम www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. शासनाने निर्गमित केलेल्या सुधारीत सेवाप्रवेश नियम व विविध शासन निर्णय / परिपत्रकांमधील सुचनांनुसार पोलीस शिपाई पदाची भरती घेण्याची सर्व घटक प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

४. पोलीस शिपाई चालक पदाचे भरतीसाठी शासन अधिसूचना गृह विभाग क्रमांक एमटीएस ०९०९/१५३२/प्र.क्र.२९२/पोल ४, दिनांक ०६.०९.२०१९ व दि.२७.०६.२०२२, व दि.२३.०९.२०२२ अन्वये निर्गमित केले आहेत. तसेच, सदरहू सेवाप्रवेश नियमांमध्ये शासनाने वेळोवेळी सुधारणा केलेली आहे. सदरचे नियम www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. शासनाने निर्गमित केलेल्या सुधारीत सेवाप्रवेश नियम व विविध शासन निर्णय / परिपत्रकांमधील सुचनांनुसार पोलीस शिपाई चालक पदाची भरती घेण्याची सर्व घटक प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

५. राज्य राखीव पोलीस बल गटातील पोलीस भरतीसाठी शासनाने शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक आरटीआर-०३१२/प्र.क्र.२३४/पोल-५अ, दिनांक ०८/१०/२०१२ अन्वये "महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश नियम) २०१२" निर्गमित केले आहेत. तसेच, सदरहू सेवाप्रवेश नियमांमध्ये शासनाने वेळोवेळी सुधारणा केलेली आहे. सदरचे नियम www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी समादेशक, राज्य राखीव पोलीस बल यांनी सदर सेवाप्रवेश नियम व विविध शासन निर्णय / परिपत्रकांमधील सुचनांनुसार सशस्त्र पोलीस शिपाई पदाची भरती घेण्याची समादेशकांनी दक्षता घ्यावी.

६. **सन २०२२ व २०२३ ची पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया खालील टप्प्यांप्रमाणे राबविण्यात येणार आहे:**

१) दिनांक <u>०३/०६/२०२४</u> नंतर ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या आवेदन अर्ज घटक प्रमुखांना डाऊनलोड करुन घेण्याबाबतची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

२) सेवाप्रवेश नियमानुसार **पोलीस शिपाई या पदासाठी** अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यांत येईल. त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही सर्व पोलीस घटकांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यानुसार घटक प्रमुखांनी शारिरीक चाचणी विहित कालावधीत पूर्ण करावी.

३) सेवाप्रवेश नियमानुसार **पोलीस शिपाई चालक या पदासाठी** अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यांत येईल. त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही सर्व पोलीस घटकांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यानुसार घटक प्रमुखांनी शारिरीक चाचणी विहित कालावधीत पूर्ण करावी.

४) सेवाप्रवेश नियमानुसार **पोलीस शिपाई बॅण्डस्मन या पदासाठी** अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यांत येईल. त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही सर्व पोलीस घटकांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यानुसार घटक प्रमुखांनी शारिरीक चाचणी विहित कालावधीत पूर्ण करावी.

५) सेवाप्रवेश नियमानुसार **राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी** अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम १०० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल. त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही राज्य राखीव पोलीस बलातील सर्व गटांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यानुसार घटक प्रमुखांनी शारिरीक चाचणी विहित कालावधीत पूर्ण करावी.

६) सेवाप्रवेश नियमानुसार **कारागृह शिपाई या पदासाठी** अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यांत येईल. त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही सर्व कारागृह विभागाकरीता लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यानुसार घटक प्रमुखांनी शारिरीक चाचणी विहित कालावधीत पूर्ण करावी.

७) महाआयटी विभागाकडून प्राप्त झालेल्या पोलीस भरतीसाठी आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचे आवेदन अर्ज तपासून घटक प्रमुखांनी खात्री करावी. प्राप्त झालेल्या एकुण आवेदन अर्जानुसार प्रत्येक दिवशी तारखेनिहाय किती उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे त्याबाबतचे मैदानी चाचणीचे सविस्तर वेळापत्रक तयार करुन तसे या कार्यालयास व महाआयटी विभागास पाठविण्यात यावे. प्रत्येक दिवशी किती उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे व सदरची शारीरिक चाचणी कोठे घेण्यात येणार आहे त्या ठिकाणाचा (मैदानाचा) सविस्तर उमेदवारांना कळेल असा पत्ता याबाबतची माहिती महाआयटी विभागास raunak.saraf@mahait.org या संकेत स्थळावर कळवावी. त्याप्रमाणे महाआयटी विभागास उमेदवारांकरीता शारिरिक चाचणीचे प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने पुरविणे वेळीच शक्य होईल. महाआयटी विभागास वेळोवेळी माहिती पुरविण्यासाठी एक समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी. त्या अधिकाऱ्याचे पद, मोबाईल क्रमांक, दुरध्वनी क्रमांक व इ-मेल कळविण्यात यावे.

**८) भरती प्रक्रियेची शारीरिक चाचणी दिनांक १९.०६.२०२४ पासून सुरु करावयाची असल्याने महाआयटी विभागास दिनांक ०७.०६.२०२४ रोजी १६.०० वाजेपावेतो शारीरिक चाचणीचे वेळापत्रक खालील नमुद विवरणपत्रात माहिती सादर करावी.**

**SAMPLE FORMAT FOR PHYSICAL EXAM HALL TICKET GENERATION-2022-2023**

| Sr No | Unit Name | Post | Candidate Count | Exam Date | Exam Time | Exam Venue with Pin Code | Male / Female / Transgender | Parallel Reservation (mention : ex-servicemen / merit sportsman only) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | CP Pune | Police Constable | 500 | 10-06-2024 | 8:00 AM | Pune Police Commissionerate Kavayat Maidan, Ganesh Khind, Shivaji Nagar, Pune - 411005 | Male | NA |
| 2 | CP Pune | Police Constable | 500 | 10-06-2024 | 8:00 AM | Pune Police Commissionerate Kavayat Maidan, Ganesh Khind, Shivaji Nagar, Pune - 411005 | Female | NA |
| 3 | CP Pune | Police Constable | 350 | 11-06-2024 | 11:00 AM | Pune Police Commissionerate Kavayat Maidan, Ganesh Khind, Shivaji Nagar, Pune - 411005 | Male | Ex Servicemen |
| 4 | CP Pune | Police Constable | 180 | 11-06-2024 | 11:00 AM | Pune Police Commissionerate Kavayat Maidan, Ganesh Khind, Shivaji Nagar, Pune - 411005 | Male | Merit Sportsman |

९) आवेदन अर्जात सादर नमूद कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या पडताळणीत आणि शारीरिक मोजमापात पात्र असलेल्या उमेदवारांची मैदानी चाचणी घेणे.

१०) **चालक पोलीस शिपाई पदासाठी कौशल्य चाचणी :-**

(एक) शारीरिक चाचणी झाल्यानंतर शारिरीक चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवून लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी खालीलप्रमाणे द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील. .

(दोन) कौशल्य चाचणीमध्ये पुढील चाचण्यांचा समावेश असेल :-

(अ) हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी - २५ गुण

(ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी - २५ गुण

(तीन) कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत.

(चार) वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्याकरीता, समितीमध्ये प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

याबाबत या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक प्रशि/पोशि भरती/ चालक - सेवाप्रवेश नियम /४३७/२०१९/८७१, दिनांक १६.०३.२०२१ नुसार कौशल्य चाचणी घेण्याबाबतची मार्गदर्शिका व समिती गठीत करण्याबाबत सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यांत आले आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

**१०)** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केल्याबाबतचे शासन आदेशान्वये बॅण्डस्मन प्रात्यक्षिक चाचणी खालीलप्रमाणे घेण्यात येईल. सदरहू परीक्षा अर्हता परीक्षा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

(i) बँड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बँड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.

(ii) पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठीत करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बँड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

(iii) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्यही बजावणे आवश्यक राहिल.

(iv) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील.

**११) लेखी परीक्षा :-** सेवाप्रवेश नियमांमधील तरतुदी शारीरिक चाचणीमध्ये कमीत कमी ५०% गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांमधून प्रवर्गनिहाय १:१० या प्रमाणानुसार लेखी परीक्षेसाठी उमेदवारांची यादी तयार करावी. या यादीमधील त्या त्या प्रवर्गातील शेवटच्या उमेदवारास जेवढे गुण मिळालेले आहेत, त्या समान गुण मिळविणाऱ्या सर्व उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाईल. **लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. इतर कुठल्याही भाषेत लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. लेखी परीक्षा OMR पद्धतीने घेण्यात यावी. उत्तरप्रत्रिकेची तपासणी झाल्यानंतर नमूना चेक (Random sampling) करण्यात यावा.**

**१. पोलीस शिपाई पदाकरीता.:-**

- शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.
- उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.
- लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून दिनांक निश्चित करण्यात येईल. **सर्व पोलीस घटकांच्या भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा ही एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल.**
- लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:-
  १. अंकगणित;
  २. सामान्य ज्ञान व चालू घडामोडी;
  ३. बुध्दीमत्ता चाचणी;
  ४. मराठी व्याकरण

**२. बॅण्डस्मन पदाकरीता.:-**

- शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.

- उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.
- लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून दिनांक निश्चित करण्यात येईल. **सर्व पोलीस घटकांच्या भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा ही एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल.**
- लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:-

  १. अंकगणित;
  २. सामान्य ज्ञान व चालू घडामोडी;
  ३. बुध्दीमत्ता चाचणी;
  ४. मराठी व्याकरण

**३. पोलीस शिपाई चालक पदाकरीता.**

- शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.
- लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी (अ) हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी (२५ गुण) व (ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी (२५ गुण) अशा दोन चाचण्या द्याव्या लागतील. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल.
- कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकूण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत.
- कौशल्य चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना लेखी चाचणीसाठी बोलविण्यांत येईल. लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा दिनांक निश्चित करण्यात येईल. **सर्व पोलीस घटकांच्या भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा ही एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल.**
- लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :-

  १) अंकगणित
  २) सामान्यज्ञान व चालू घडामोडी
  ३) बुध्दीमत्ता चाचणी
  ४) मराठी व्याकरण आणि
  ५) मोटार वाहन चालविणे / वाहतुकीबाबतचे नियम

**४.सशस्त्र पोलीस शिपाई पदाकरीता.**

- शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.
- उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.
- लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा दिनांक

निश्चित करण्यात येईल. **राज्य राखीव पोलीस बलातील सर्व गटाच्या भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा ही एकाच दिवशी घेण्यात येईल.**

- लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:-
  १) अंकगणित;
  २) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी;
  ३) बुध्दीमत्ता चाचणी;
  ४) मराठी व्याकरण

**५. कारागृह शिपाई पदाकरीता.:-**

- शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.
- उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.
- लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून दिनांक निश्चित करण्यात येईल. **सर्व कारागृह विभागांच्या भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा ही एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल.**
- लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:-
  १) अंकगणित;
  २) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी;
  ३) बुध्दीमत्ता चाचणी;
  ४) मराठी व्याकरण

**१२) OMR Vendor यांची नियुक्ती :-** OMR Vendor यांची नियुक्ती करतांना त्या Vendor यांची प्रोफाईल तपासण्यात यावी. त्यांचा OMR परीक्षा घेण्याबाबतचा त्यांचा यापूर्वीचा अनुभव तपासण्यात यावा. तसेच OMR Vendor सदरची परीक्षा कश्या पध्दतीने घेणार आहे, याबाबतचे OMR Vendor यांचेकडून सादरीकरण करुनच त्यांना नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही करावी. OMR vendor नियुक्त करण्यासाठी एक समिती गठीत करुन त्याबाबत खालील अटीच्या अधीन राहून OMR Vendor याची नियुक्ती करण्यात यावी.

- OMR Vendor चे काम OMR Sheet चा पुरवठा करणे व OMR उत्तरपत्रिका Scan करणे व त्यांची पडताळणी करणे राहील. उर्वरित सर्व कामे घटक प्रमुखांनी करावयाची आहे, उदा. लेखी परीक्षेसाठी प्रश्न पत्रिका तयार करणे, त्याचे प्रकाशन करणे, वितरीत करणे, पर्यवेक्षण करणे, बंदोबस्त लावणे, शाळा अथवा कॉलेज भाडेतत्वावर घेणे इ. स्वरुपाचे काम घटक प्रमुखांनी करावयाचे आहे.

- कंपनीची निवड करतांना संबंधित कंपनीस जिल्हयासह इतर दोन जिल्हयात अथवा राज्यात शासकीय / निमशासकीय पदभरतीच्या स्पर्धा परीक्षा OMR Sheets तपासणीचा अनुभव असावा.
- कंपनीची निवड करतांना सदर कंपनीचे नाव मागील ५ वर्षात कोणत्याही राज्य शासनाच्या / केंद्र शासनाच्या कोणत्याही विभागाच्या काळया यादीत नसावे.
- OMR Sheets तपासणी अत्यंत पारदर्शकपणे, विश्वासार्ह होणे, गोपनीयता बागळून, सुरक्षितरित्या व सुलभतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व उपाययोजना करण्याची क्षमता कंपनीकडे आहे याची खात्री करावी.

- लेखी परीक्षेदरम्यान डमी उमेदवार परीक्षेस बसणार नाही यासाठी संबंधित उमेदवाराची ओळख पटवून त्यांना परीक्षेसाठी बसण्याची परवानगी देण्यात यावी. तसेच परीक्षेदरम्यान संपूर्ण परिसर CCTV च्या निगराणीखाली येईल. तसेच प्रत्येक उमेदवारांचा चेहरा पूर्णत: CCTV मध्ये कॅप्चर होईल याची दक्षता घ्यावी. कारण अंतिम निवडयादी बनवितांना पडताळणीच्या वेळेस तो उमेदवार डमी होता किंवा नाही याची खात्री करणे सोपे होईल.
- परीक्षा केंद्रावर उमेदवारांची कसुन तपासणी करावी. उमेदवारांकडे कोणतेही इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस अथवा ब्ल्यूटुथ असे कोणतेही उपकरण नाही याची खात्री करावी.
- परीक्षार्थींनी सोडविलेला पेपर हा घटक प्रमुखांनी स्वत:चे ताब्यात सीलबंद ठेवावा व वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष तो पेपर OMR Vendor यांना Scanning साठी द्यावा व Scanning झाले नंतर तो मुळ पेपर पुन्हा ताब्यात घेवून सीलबंद करावा. Scanning चे ठिकाणी CCTV लावावेत व पूर्णवेळ त्या ठिकाणी वरिष्ठ पोलीस अधिकारी हजर राहतील याची दक्षता घ्यावी. OMR Vendor यांना Model Answer Key देतांना तो त्याचा दुरुपयोग करणार नाही याची दक्षता घ्यावी.
- OMR Vendor यांनी त्यांचे नियुक्ती केलेले कर्मचारी यांच्यावर Scanning च्या वेळी देखरेख ठेवावी. OMR शीट तपासणीसाठी दिलेनंतर ते मिळालेल्या मार्क्सचा तक्ता देईपर्यंत सदरचे कर्मचारी इतरत्र कोठेही जाणार नाहीत अथवा कोणाशीही संपर्कात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच त्या दरम्यान सदरचे कर्मचारी मोबाईल फोन व इतर गॅजेटचा वापर करणार नाही यावर लक्ष ठेवावे.
- OMR Vendor यांनी दिलेला निकाल / दर्शविलेले मार्क्स बरोबर आहेत अगर कसे याबाबत अंदाजे ५ ते १०% Random पध्दतीने मॅन्युअली पेपर चेक करावेत. त्यानंतरच निकाल जाहिर करावा.
- जेथे उमेदवारांची संख्या कमी असेल व OMR Vendor उपलब्ध नसतील तेथे त्या घटक प्रमुखांनी सदरच्या लेखी परीक्षा OMR पध्दतीने स्वत: घेवू शकतात व OMR Sheets तपासणी मॅन्युअली करु शकतात. त्यासाठी OMR Vendor ची नियुक्ती करण्याची आवश्यकता नाही.
- प्रश्नपत्रिका तयार करतांना घटक प्रमुखांनी सेवाप्रवेश नियमात दिलेल्या सुचनेनुसार प्रत्येक विषयास समान गुण येतील त्याप्रमाणे प्रश्न निश्चित करण्यात यावे.
- सदरची परीक्षा १२ वी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांकरिता असल्याने घटक प्रमुखांनी प्रश्न विचारतांना शक्यतो स्थानिक पातळीवरील प्रश्न विचारावेत. MPSC व UPSC च्या धर्तीवर उच्च प्रतीचे प्रश्न विचारु नयेत. राजकीय स्वरुपाचे अथवा विवादित स्वरुपाचे प्रश्न विचारणे टाळावे.
- प्रश्नपत्रिका तयार करतांना प्रश्नपत्रिका अत्यंत गोपनीयता बाळगावी. प्रश्नपत्रिका लिक होणार नाही याची खबरदारी प्रत्येक घटक प्रमुखांनी घ्यावी.

**१३)** पोलीस शिपाई भरती याची कार्यपध्दतीबाबतच्या सुचना सविस्तरपणे (Flow Chart) सोबत जोडल्या आहेत.

**१४) गडचिरोली जिल्ह्यासाठी:** पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांनी त्यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई व पोलीस शिपाई चालक पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांची शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१५१७/प्र.क्र.२४१/पोल-५अ, दिनांक २३.३.२०१८ व क्रमांक एमटीएस ०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४, दिनांक २३.०९.२०२२ मधील तरतुदींनुसार गोंडी व माडीया भाषेत अतिरिक्त १०० गुणांची चाचणी घ्यावी.

**१५)** शारिरीक चाचणी व लेखी चाचणी (एनसीसी क प्रमाणपत्र असल्यास) अशा चाचण्यांमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या आधारावर उमेदवारांची गुणवत्ता यादी पोलीस घटक प्रमुखांनी तयार करावी. सदरहू गुणवत्ता यादीमधून, जाहिरातीत नमूद केलेल्या प्रवर्गनिहाय रिक्त पदांनुसार शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६.३.१९९९, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही १०१२८/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३.०८.२०१४, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण १११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९.१२.२०१८ व शासन निर्णय गृहविभाग क्रमांक पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५ अ, दिनांक १०.१२.२०२० व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक २५.०१.२०२४ मधील सुचनांनुसार कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरती निवडयादी / प्रतीक्षा यादी तयार करावी.

**१६)** तात्पुरत्या निवड/प्रतीक्षा यादीतील जे उमेदवार कागदपत्र पडताळणीमध्ये "पात्र" ठरतील त्या उमेदवारांचा समावेश करुन जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सामाजिक / समांतर आरक्षणानुसार अंतिम निवडसूची व प्रतीक्षासूची

तयार करावी. (तात्पुरत्या निवड / प्रतीक्षा यादीमधून आवश्यक तेवढे "पात्र" उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, तर वरील परिच्छेद १५ नुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीमधील आवश्यक तेवढ्या सामाजिक / समांतर आरक्षणातील उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन "पात्र" ठरलेल्या उमेदवारांचा समावेश करुन जाहिर केलेल्या पदांनुसार निवडयादी/प्रतीक्षायादी पूर्ण करावी).

**१७) आवश्यक कागदपत्र पडताळणी:- सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे व कागदपत्रे आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक १५.०४.२०२४ किंवा त्यापुर्वी उमेदवारांनी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. (उदा. १. SSC / HSC उत्तीर्ण प्रमाणपत्र, २)जन्मदाखला, ३) रहिवाशी प्रमाणपत्र, ४) जातीचे प्रमाणपत्र ५) जात - वैधता प्रमाणपत्र, ६)संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MSCIT), ७)खेळाडू प्रमाणपत्र व पडताळणी अहवाल (शासन निर्णय दि.१७/३/२०१७ व दि. ११/०३/२०१९ प्रमाणे), ८)महिला उमेदवारांकरिता व अजा, अज उमेदवार वगळता इतर मागासवर्गीय उमेदवारांकरिता नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र, ९)माजी सैनिकांसाठी Discharge प्रमाणपत्र, १०)गृहरक्षक दलाकरिता आवश्यक असलेले प्रमाणपत्र, ११) प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र १२) भुकंपग्रस्ताचे प्रमाणपत्र, १३) पोलीस पाल्य प्रमाणपत्र, १४) अनाथाबाबतचे प्रमाणपत्र १५) अंशकालीन प्रमाणपत्र १६) इडब्ल्यूएस प्रमाणपत्र १७) एसईबीसी प्रमाणपत्र व १८) NCC प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे.**) एसईबीसी उमेदवारांनी एसईबीसी व नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र प्राप्त होण्याकरीता तहसिल किंवा सेतू अथवा संबंधित कार्यालयास दिनांक १५.०४.२०२४ रोजी किंवा त्यापुर्वी अर्ज सादर केल्याची पोचपावती सोबत असणे आवश्यक आहे. परंतु अंतिम निवडयादीच्या वेळी त्यांच्याकडे विहित नमुन्यातील सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे. उपरोक्त नमूद कागदपत्रे शासन निर्णयानुसार व परिपत्रकानुसार तात्पुरती निवडयादी तयार झाल्यानंतर तपासण्यात येतील. परंतू एनसीसीबाबतचे प्रमाणपत्र हे तात्पुरती निवडयादी तयार करण्याच्या अंतिम निकाल पत्राच्या अगोदर पडताळणी करण्यात यावी, जेणेकरुन त्याबाबतचे अधिक ५ गुण देण्याबाबतची कार्यवाही करता येईल.

(i) **नॉन क्लिमिलेअर प्रमाणपत्राबाबत** :- विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, एसईबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी मूळ कागदपत्र तपासणी वेळी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **लगतच्या आर्थिक वर्षाचे म्हणजे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे** मूळ नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non-Creamy Layer Certificate) सादर करावे. शासन शुध्दीपत्रक, इतर समाज बहुजन कल्याण विभाग क्रमांक संकीर्ण २०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ९ मार्च २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी कालावधीत विचारात घेण्यात येईल. परंतु संवर्गाकरिता २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे **अनिवार्य** राहील.

(ii) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक: बीसीसी-२०११/प्र.क्र.२६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये ज्या उमदेवारांची निवड मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे. अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासणीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील.

(iii) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्रमांक महिआ २०२३/प्र.क्र.१२३ /कार्या-२, दिनांक ०४ मे २०२३ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवार्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून

वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेआर प्रमाणपत्र सादर करण्यातबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

७. **शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणी घेताना जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सर्व घटक प्रमुखांनी दक्षता घ्यावी. प्रत्येक घटक प्रमुखांनी शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणीसाठी घ्यावयाच्या तंत्रज्ञानाचा अवलंब करतांना आर्थिक दृष्टीकोणातून विचार करुन त्याआधारे तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात यावा. मैदानी चाचणी व लेखी परीक्षेसाठी प्रति उमेदवार रु.३००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार घटक प्रमुखांनी खर्च करतांना काळजी घेणे आवश्यक आहे.**

८. भरती प्रक्रियेसाठी घटक प्रमुखांकडून वापरण्यात येत असलेल्या कार्यप्रणालीने दिलेला निकाल किंवा निवडसूची प्रसिध्द न करता, सदरहू निकाल व निवडसूची काळजीपूर्वक तपासून घेऊन बिनचूक निकाल व निवडसूची प्रसिध्द करावी. तसेच, भरती प्रक्रियेशी संबंधीत सेवाप्रवेश नियम, शासन निर्णय, परिपत्रके यामधील सुचनांचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

९. **प्रमाणपत्रांचा निश्चीती दिनांक (cut off date):-** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ४(पाच) व ६(आठ) व ६(नऊ) मधील तरतुदींनुसार खेळाडू उमेदवारांनी, आवेदन अर्ज भरण्यापुर्वीच त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्राची संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्याकडून पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे किंवा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२ / प्र.क्र. ६८ / क्रीयुसे-२, दिनांक ११.०३.२०१९ मधील अ.क्र. ३. (IX) नुसार क्रिडा अर्हतेनुसार संबंधित पदाच्या भरतीसाठी जाहिरात आल्यास अर्ज करताना खेळाडूने उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणी करुन मिळण्याबाबत केलेल्या अर्जाची पोच पावती अथवा या पूर्वी खेळाडूस उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्राप्त झालेला प्रमाणपत्र पडताळणी अहवाल जोडणे बंधनकारक आहे. अर्जासोबत उपरोक्त तपशील सादर न करणाऱ्या उमेदवारांचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही. त्यामुळे खेळाच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीचा अहवाल वगळता, उमेदवाराने कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर केलेली कागदपत्रे / प्रमाणपत्र भरती समितीने विचारात घ्यावीत. उमेदवाराची प्रमाणपत्रे ही अंतिम निवडसुचीच्यावेळी तपासण्यात यावीत.

१०. शासन पत्र, गृह विभाग क्र. आरसीटी-०३१०/प्र.क्र.२१२/पोल-५अ, दि.१६/०४/२०१०, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, परिपत्रक क्र. सीबीसी-२०१२/प्र.क्र. १८२/विजाभज-१, दिनांक २५.०३.२०१३ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीजेएनटी-२०१४/प्र.क्र. ११८/व्हिजेएनटी-१, दिनांक ३१.०७.२०१४ मधील सुचनांनुसार क्रिमीलीयरचे तत्व लागू करण्यात आलेल्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना जाती प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अशी दोन्ही प्रमाणपत्रे असतील तरच आरक्षण विषयक लाभ देय ठरतो. ही दोन्ही प्रमाणपत्रे नसतील तर आरक्षण विषयक लाभ देय ठरणार नसून अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात यावे व खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या वयोमर्यादेच्या अटी त्यांना लागू राहतील. तसेच नॉन क्रिमिलियरचे प्रमाणपत्र हे दिनांक १५.०४.२०२४ किंवा त्या पूर्वीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. परंतू त्यांची मुदतही वाढीव असल्यास तेही अनुज्ञेय ठरणार आहे. त्यानुषंगाने पोलीस शिपाई / पोलीस शिपाई चालक / सशस्त्र पोलीस शिपाई / पोलीस शिपाई बॅण्डस्मन व कारागृह शिपाई या पदासाठी **वयोमर्यादा ही दि.३१.०३.२०२४ अशी निश्चित करण्यात आलेली आहे**. परंतु गृहरक्षक दलासाठी जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात कमीत कमी ३ वर्षे (१०९५दिवस) एकत्रित सेवा झालेल्या व सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक शैक्षणिक व शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या, विहित वयोमर्यादेतील उमेदवारांसाठी समांतर आरक्षणांतर्गत राखीव आहेत.

११ **निवड मंडळ :-** मा.पोलीस महासंचालक यांनी खालील प्रमाणे निवड मंडळ गठित केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त / पोलीस आयुक्त यांनी निर्देशीत केलेले अपर पोलीस आयुक्त पेक्षा कमी दर्जा नसलेले अधिकारी / पोलीस अधिक्षक / समादेशक | अध्यक्ष |
| २. | अल्पसंख्यांक समाजाचा अधिकारी | सदस्य |
| ३. | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | सदस्य |
| ४. | समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ५. | आदिवासी विकास अधिकारी | सदस्य |
| ६. | प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी (वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीबाबत) | सदस्य |
| ७. | पोलीस बॅण्ड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठीत करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बॅण्ड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा. | सदस्य |
| ८. | कारागृह विभागातील पोलीस अधिक्षक दर्जाचा एक अधिकारी (ज्या पोलीस घटकांद्वारे कारागृह विभागातील कारागृह शिपाई यांची भरती प्रक्रिया राबविली जाईल) | सदस्य |

**१२. शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणी सर्वसाधारण सूचना:- शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणी घेताना जास्तीत जास्त अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा व चाचणी दरम्यान संबंधित घटक प्रमुखांनी खालील प्रमाणे दक्षता घ्यावी :-**

१. उमेदवार भरती प्रक्रियेकरिता मैदानावर प्रथमत: उपस्थित झाल्यानंतर, सदरहू उमेदवाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी उमेदवाराचा आवेदन अर्जावरील फोटो, उमेदवारास शासनाकडून निर्गमित करण्यात आलेले आधारकार्ड (असल्यास) / चालक परवाना / महाविद्यालयाने निर्गमित केलेले ओळखपत्र यावरुन खातरजमा करुन घ्यावी. उमेदवाराची खात्री पटल्यानंतर सेवाप्रवेश नियमांमधील तरतुदीनुसार उमेदवाराचे शारिरीक मोजमाप घ्यावे.

२. **पोलीस भरती पारदर्शक पद्धतीने होण्याकरिता उमेदवारांची उंची मोजण्याकरिता असलेले उंची मोजमापाचे स्टँड व छातीच्या मोजमापासाठी वापरण्यात येणारी टेप इत्यादी हे वैधमापन शास्त्र (वजनमापे) यांचे जिल्हा पातळीवरील अधिकारी यांचेकडून भरती प्रक्रिया सुरु होण्यापुर्वी प्रमाणित करुन घ्यावे.** तसेच, सदरहू साधणे प्रमाणित करुन घेतली असल्याचे प्रमाणपत्र पोलीस घटक कार्यालयांनी प्राप्त करुन घ्यावे.

३. शारीरिक मोजणी झाल्यावर उमेदवारास चेस्ट नंबर दिल्यानंतर लगेचच चेस्ट नंबर उमेदवाराच्या छातीवर लावून Call Letter सोबत त्याचा फोटो काढून ठेवावा व त्याचा एक स्वतंत्र फोल्डर तयार करुन संगणकामध्ये सुरक्षित जतन करुन ठेवावा.

४. उमेदवाराच्या शारीरिक मोजणीसह प्रत्येक मैदानी चाचणीचे चित्रिकरण करण्यात यावे. जेणेकरुन शारीरिक चाचणीकरीता उपस्थित राहिलेला उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र झाल्यास त्याजागी बोगस अथवा डमी उमेदवार लेखी चाचणीसाठी उपस्थित राहणार नाही याची चित्रीकरण केलेल्या फुटेज व चेस्ट क्रमांकासहित काढलेल्या फोटोवरुन उमेदवाराची खातरजमा करणे सोईस्कर होईल. तसेच मैदानी चाचणी चे पर्यवेक्षणासाठी उमेदवारांची घेण्यात येणारी संपूर्ण चाचणी C.C.T.V. मध्ये समाविष्ठ होईल अशाप्रकारे मैदानात C.C.T.V. लावण्यात यावेत.

५. शारीरिक चाचणीसाठी प्रत्येक चाचणी प्रकारासाठी ०१ पोलीस निरीक्षक व ०२ सहायक पोलीस निरीक्षक अथवा पोलीस उपनिरीक्षक व ५ कर्मचारी यांचा एक गट बनविण्यात यावा. प्रत्येक दिवशी होणाऱ्या शारीरिक चाचणीच्या वेळी नेमण्यात आलेला गटाची तसेच, प्रत्येक गटामधील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची आवश्यकतेनुसार अदलाबदल करावी. तसेच, प्रत्येक दिवशी प्रत्येक शारीरिक चाचणी नुसार याबाबतची नोंद एका रजिस्टरमध्ये करण्यात यावी.

१३.	भरतीच्या स्थळी उमेदवारांकडून त्यांच्या उंची / छातीचे मोजमापाबाबत तक्रार आल्यास, या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक २० मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली फेर मोजमाप घ्यावे व त्याचा तपशील स्वत: भरती नोंदवहीत नोंदवावा. उमेदवाराच्या उंचीच्या मोजमापाबाबत खात्री झाल्या-शिवाय उमेदवारास पुढील चाचणीकरिता बसण्याची परवानगी देण्यात येवू नये. विहित शारीरिक पात्रतेच्या निकषांनुसार अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना लिखित स्वरुपात लगेचच कळवावे. विहित केलेल्या तक्त्याच्या अनुषंगाने गुण देवून प्रत्येक प्रात्यक्षिक संपल्यानंतर उमेदवाराला त्याचे गुण कळवावेत. प्रत्येक दिवशी प्रात्यक्षिक संपल्यानंतर उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांची यादी मुख्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात यावी. **उमेदवारांचे शारिरीक मोजमाप व शारिरीक चाचणी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली करुन, सदरहू कामकाजाचे चित्रीकरण करण्यात यावे.**

**१४.	गुणवत्ता यादी (महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील शिपाई पदांसाठी):-** उमेदवारांची "शारीरिक चाचणी" व "लेखी चाचणी" मध्ये प्राप्त झालेले गुण एकत्रित करुन, सामान्य प्रशासन विभागाची दिनांक १३.८.१९९९, १३.८.२०१४, १९.१२.२०१८ व २५.०१.२०२४ ची परिपत्रके व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. प्रनिमं-१२१५/(प्र.क्र.५५/ १५)/१३-अ, दि.५.१०.२०१५ व गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५ अ, दिनांक १०.१२.२०२० मधील तरतुदींनुसार निवडयादी तयार करावी. लेखी चाचणी संपल्यानंतर शक्यतो २४ तासात अथवा उमेदवारांची संख्या मोठी असल्यास लवकरात लवकर भरतीचा अंतिम निकाल सूचना फलकावर लावुन जाहिर करण्यात यावा. २४ तासांच्या आत अंतिम निकाल जाहिर करणे शक्य नसल्यास, तशा सूचना फलकावर लिहून निश्चित तारीख व वेळ उमेदवारांना कळविण्यात यावी. तसेच, निकाल घटक प्रमुखांनी त्यांच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावा. सदरची निवड यादी उमेदवारांच्या वैद्यकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी अहवालाच्या आधीन असावी.

**१५.	निवड यादी व प्रतिक्षायादी:-** उमेदवारांना शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे कागदपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरती निवडयादी / प्रतीक्षायादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार तयार करुन प्रसिध्द करण्यात येईल. (उदा. गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५ अ, दिनांक १०.१२.२०२०) तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांच्याच कागदपत्राची पडताळणी करण्यात येऊन, कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच अंतिम निवडसूची / प्रतीक्षासूचीमध्ये समावेश करण्यात येईल.

**१६.	वैद्यकिय तपासणी :-** सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार निवड झालेल्या उमेदवारांच्या वैद्यकीय तपासणी संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदी पोलीस शिपाई पदासाठीच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदी व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतुदी लागू होतील. याशिवाय तोतरेपणाची चाचणी घेण्यात यावी. निवड करण्यात आलेले जे उमेदवार वैद्यकीयदृष्ट्या पात्र ठरतील त्यांना आरक्षित पदानुसार पोलीस शिपाई पदासाठी योग्य समजण्यात यावे.

१७.	**चारित्र्य पडताळणी :-** पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांकडून साक्षांकन नमुना भरुन घेऊन, त्यांची चारित्र्य पडताळणी करुन घेण्यात यावी. याबाबत सेवाप्रवेश नियमांमधील तरतुदींचे व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही करणे नियुक्ती प्राधिकाऱ्यावर बंधनकारक राहील.

**१८.	विशेष सूचना :-**

i. भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, नि:पक्षपातीपणे व पारदर्शक (Neutral, Impartial & Transparent) होणे आवश्यक असून भरती प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार व भ्रष्टाचार होणार नाही यासाठी आयुक्तालयातील भरतीकरिता पोलीस आयुक्त हे "दक्षता अधिकारी" म्हणून काम पाहतील. तसेच, परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या पोलीस घटकात होणाऱ्या भरतीमध्ये "दक्षता अधिकारी" म्हणून त्या त्या परिक्षेत्रातील विशेष पोलीस महानिरीक्षक हे काम पाहतील. राज्य राखीव पोलीस बलामधील भरती प्रक्रियेवर विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर हे "दक्षता अधिकारी" म्हणून काम पाहतील. दक्षता अधिकारी यांचे कर्तव्ये खालील प्रमाणे राहतील :-

- दक्षता अधिकारी दर दिवशी होणारी प्रक्रियेचा आढावा घेतील.
- दक्षता अधिकारी वेळोवेळी शारीरिक मोजणी व शारीरिक चाचणी दरम्यान Randomly मैदानावर भेट देतील व कामकाजाचा आढावा घेतील.

➢ दक्षता अधिकारी स्थानिक वृत्तपत्रांमध्ये भरती बाबत येणाऱ्या बातम्यांवर लक्ष ठेवतील व जर गरज वाटली तर खुलासा देतील व संबंधित जिल्ह्यांतील घटकांना मार्गदर्शन करतील.

➢ जर एखाद्या व्यक्तीने होणाऱ्या भरती प्रक्रियेबाबत कोणत्याही प्रकारे तक्रार केली तर त्याबाबत चौकशी करतील व त्यानुसार पोलीस मुख्यालय अथवा वरिष्ठ अधिकारी यांना दक्षता अधिकारी सुचित करतील.

ii. **पोलीस भरतीमध्ये मैदानी चाचणी व लेखी चाचणीचे वेळी कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे नातेवाईक / परिचयाचे उमेदवार यांचा पोलीस भरतीमध्ये सहभाग नसल्याबाबतचे बंधपत्र संबंधित पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्याकडून घेण्यात यावे.**

iii. पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान गैरशिस्त व अशोभनीय वर्तन न करणेबाबत या कार्यालयाकडून परिपत्रक क्रमांक प्रशि/प्रलि/पोभ/गैरशिस्त/२०११/९३९, दि.०१/०३/२०११ अन्वये दिलेल्या सुचनांचे अवलोकन करावे.

iv. भरतीच्या प्रक्रियेदरम्यान खंड न देता ती सलगपणे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी. जेणे करुन भरतीच्या कामाचा ताण कमी कमी होत जावून विनाकारण तक्रारी करण्यास कोणासही वाव मिळणार नाही.

v. घटक प्रमुखांनी व दक्षता अधिकारी यांनी पोलीस भरतीच्या वेळी दक्ष राहून भरती प्रक्रिया व्यवस्थित होत आहे याची काळजी घ्यावी व त्याप्रमाणे पोलीस बंदोबस्त ठेवावा. भरतीकरिता नेमणूक केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना वेगळे ओळखपत्र द्यावे व ते त्यांनी भरतीच्या वेळी गणवेषावर लावणे बंधनकारक राहील. बाहेरील कोणत्याही व्यक्तींना भरती परिसरात प्रवेश देऊ नये. **भरती परिसरात नेमलेले अधिकारी आणि कर्मचारी मोबाईल फोनचा वापर करणार नाहीत** याची दक्षता कटाक्षाने घेण्यात यावी. उमेदवारांच्या सोयीसाठी जागोजागी सूचनांचे फलक लावावे. P. A. System, फिरते प्रसाधन गृहांची (Mobile Toilets) इ. व्यवस्था करावी. भरती कालावधीत वैद्यकीय सेवेची सोय, पिण्याचे पाणी, उपहार गृह इत्यादीची भरती प्रक्रियेपुरती सोय करावी.

vi. भरतीच्या ठिकाणी संबंधीत पोलीस घटकातील पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक / समादेशक / परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / परिक्षेत्रीय ला.लु.प्र.वि. चे पोलीस अधिक्षक / महासंचालक ला. लु. प्र. वि. म.रा. मुंबई तसेच, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रण कक्ष अधिकारी यांची नावे, दुरध्वनी व फॅक्स क्रमांक एका फलकावर ठिकठिकाणी लावण्यात यावेत. जेणेकरुन भरतीसंदर्भात कोणालाही तक्रार करावयाची असल्यास ते करु शकतील.

vii. पोलीस शिपाई भरतीकरिता महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ आणि महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश नियम), २०१२ व त्यामध्ये शासनाने केलेल्या सुधारणा तसेच, इतर संबंधीत शासन निर्णय / परिपत्रके व मार्गदर्शक तत्वांचा बारकाईने अभ्यास करुन त्यानुसार पोलीस भरतीबाबत कार्यवाही करणे घटक प्रमुखांवर बंधनकारक राहील.

viii. उमेदवारांचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य याची पडताळणी करणेकामी उमेदवारांकडून शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोलीस-१८१७/प्र.क्र.२११/पोल-५अ, दिनांक १९.७.२०१७ अन्वये निर्गमित केलेला सुधारीत साक्षांकन नमुना भरुन घेण्याची दक्षता घ्यावी. तसेच, सेवाप्रवेश नियमांतील नियम क्रमांक ५ मधील तरतुदीनुसार चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय उमेदवाराची नियुक्ती करण्यात येऊ नये. उमेदवाराचा चारित्र्य पडताळणी अहवाल आक्षेपार्ह असल्यास म्हणजेच उमेदवारांविरुद्ध गुन्हे दाखल / न्यायप्रविष्ट इ. असल्यास, अशा उमेदवारांची प्रकरणे, वरील शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीसमोर घटक प्रमुखांनी सादर करावीत. तसेच, सदरहू समितीच्या शिफारशीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही नियुक्ती प्राधिकारी यांनी करावी.

ix. शारिरीक चाचणीतील १,६०० मीटर, ८०० व १०० मीटर अंतर धावणे या शारीरिक चाचणीत उमेदवारांची गैरसोय होऊ नये व कोणतीही अडचण येणार नाही, याकरिता घटक प्रमुखांनी वेळेचे नियोजन करावे. उमेदवारांकरिता जागोजागी पाण्याची तसेच वैद्यकीय व्यवस्था आणि रुग्णवाहिकेची व्यवस्था करावी. धावण्याच्या चाचणीची सुरवात ज्या ठिकाणापासून करणार आहेत त्या ठिकाणी (Starting point) केळी, बिस्किटे तसेच इतर खाण्याच्या वस्तु उमेदवारांना सशुल्क तत्त्वावर उपलब्ध करुन द्याव्यात. उमेदवारांना

त्यांच्या क्षमतेप्रमाणे चाचणी पार पाडण्याची तसेच स्वत:ची काळजी घेण्याबाबत स्पष्ट सूचना लाऊड स्पिकरद्वारे द्याव्यात. सदर चाचणीत उमेदवाराच्या जिवितास हानी पोहचून काही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घ्यावी. सद्या उन्हाळा सुरु असल्याने वातावरणातील स्थानिक तापमान विचारात घेऊन उमेदवारांची शारीरिक चाचणी आवश्यकतेनुसार सकाळी ०९.०० वाजेपर्यंत व सायंकाळी ०५.०० वाजतानंतर घेण्याबाबतची दक्षता घ्यावी. तसेच लवकरच पावसाळा सुरु होणार असल्याने शारीरिक चाचणी कोरड्या मैदानामध्ये घेण्यात यावी.

**१९. इतर महत्वाच्या सूचना**

- शरिरीक मोजमापे व शारिरीक चाचणी यामध्ये उमेदवाराला कोणताही निर्णय मान्य नसल्यास त्याला दोन वेळा अपिलाची संधी देण्यात येत आहे. शारीरिक मोजमापे व शरीरिक चाचणी घेण्यासाठी जो जबाबदार अधिकारी नेमला असेल, त्या अधिकाऱ्याच्या वरिष्ठ दर्जाचा अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून काम करेल. जर प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाने उमेदवाराचे समाधान झाले नाही तर, त्याला दाद मागण्यासाठी द्वितीय अपिलीय अधिकाऱ्याची नेमणूक करावी. द्वितीय अपिलीय अधिकारी हा प्रथम अपिलीय अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी असेल. अपिलावर घेतलेल्या निर्णयाबाबतची नोंद स्वत: अपिलीय अधिकारी भरती नोंदवहीमध्ये घेतील.

**२०.भरतीबाबत निवड समिती व अपिलीय समित्यांची कार्यपध्दती:-**

शरिरीक मोजमापे व शारिरीक चाचणी यामध्ये उमेदवाराला कोणताही निर्णय मान्य नसल्यास त्याला दोन वेळा अपिलाची संधी देण्यात येत आहे. शारीरिक मोजमापे व शरीरिक चाचणी घेण्यासाठी जो जबाबदार अधिकारी नेमला असेल, त्या अधिकाऱ्याच्या वरिष्ठ दर्जाचा अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून काम करेल. जर प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाने उमेदवाराचे समाधान झाले नाही तर, त्याला दाद मागण्यासाठी द्वितीय अपिलीय अधिकाऱ्याची नेमणूक करावी. द्वितीय अपिलीय अधिकारी हा प्रथम अपिलीय अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी असेल. अपिलावर घेतलेल्या निर्णयाबाबतची नोंद स्वत: अपिलीय अधिकारी भरती नोंदवहीमध्ये घेतील.

**उदा:**

| | | |
|---|---|---|
| जबाबदार अधिकारी | :- | पोलीस निरीक्षक |
| प्रथम अपिलीय अधिकारी | :- | सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उप अधीक्षक |
| द्वितीय अपिलीय अधिकारी | :- | पोलीस उप आयुक्त / अपर पोलीस अधीक्षक / पोलीस अधीक्षक |

२०. वरील कार्यपध्दती व जाहिरातीच्या मसुद्याबाबत काही सूचना / अभिप्राय द्यायचे असतील तर, घटक प्रमुखांनी त्यांच्या सूचना / अभिप्राय उलट टपाली या कार्यालयास पाठवाव्यात.
**(मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने.)**

प्रविण पडवळ 05.06.'24

**( प्रविणकुमार पडवळ )**
विशेष पोलीस महानिरीक्षक
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / ठाणे शहर / नवी मुंबई / पुणे शहर /पिंपरी चिंचवड / मिरा भाईंदर / सोलापूर शहर नाशिक शहर / छत्रपती संभाजीनगर शहर / अमरावती शहर / नागपूर शहर / लोहमार्ग, मुंबई.

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण / रायगड / पालघर / सिंधुदूर्ग / रत्नागिरी / नाशिक ग्रामीण / अहमदनगर /
जळगांव/ धुळे / नंदुरबार/कोल्हापूर / पुणे ग्रामीण / सातारा/सांगली/ सोलापूर ग्रामीण /
छत्रपती संभाजीनगर ग्रामीण / जालना/ बीड/ धाराशीव/ नांदेड/ परभणी / लातूर /
नागपूर ग्रामीण / भंडारा / चंद्रपूर / वर्धा / गडचिरोली / गोंदिया /अमरावती ग्रामीण /
अकोला / बुलढाणा / यवतमाळ / वाशिम / लोहमार्ग, पुणे व लोहमार्ग, छत्रपती संभाजीनगर.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.

प्रत:- पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उपमहानिरीक्षक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर

प्रत सविनय सादर,
अपर मुख्य सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

# FLOW CHART OF RECRUITMENT.

१. उमेदवाराचा प्रवेश

२. हजेरीपट टेबल

३. उंची मोजणे

४. छाती मोजणे

५. शारीरिक चाचणीसाठी पात्र / अपात्र टेबल

६. शारीरिक चाचणीसाठी चेस्ट नंबर देणे व उमेदवाराचा चेस्ट नंबरसह फोटा काढणे.

७. स्कॉड बनविणे
(आवेदन अर्जाची संख्या विचारात घेऊन आवश्यकतेनुसार कमीत कमी २० उमेदवारांचा अथवा घटक प्रमुखांच्या निर्णयानुसार)

८. १०० मीटर धावणे

९. १६०० मीटर धावणे (पुरुष)
८०० मीटर धावणे (महिला)

१०. गोळाफेक

११. संगणक कक्ष (गुण भरणे)

१२. गुणवत्तेनुसार व प्रवर्गनिहाय यादीनुसार १:१० याप्रमाणे लेखी परीक्षेकरीता उमेदवार निश्चित करणे

१३. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांनी निश्चित केलेल्या दिनांकास लेखी परीक्षा घेणे

१४. लेखी परीक्षेचा निकाल जाहिर करणे.

१५. शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेचे गुण एकत्र करुन एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे. त्यामध्ये उमेदवाराकडे NCC चे 'C' प्रमाणपत्र च्या आधारे ०५ अधिक गुण देण्यात यावेत.

१६. गुणवत्ता यादीमधुन जाहिरातमध्ये नमूद रिक्त पदांनुसार तात्पुरती निवडयादी / प्रतिक्षा यादी तयार करणे.

१७. आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी

१८. अंतिम निवड यादी

१९. नियुक्ती आदेश निर्गमित करणे

२०. उमेदवारांची वैद्यकिय चाचणी व चारित्र्य पडताळणी घेणे.

२१. नियुक्ती आदेश निर्गमित करणे.